पार्श्वभूमी

शनिवार २८ डिसेंबर २०१९ पान ६

## काँग्रेसचा वर्धापन दिन साजरा करणार – मिठे पाटील

# बीड जिल्ह्यातील १३८ दिव्यांगाना मोफत कृत्रिम अवयवाचे वाटप

## दिव्यांगांच्या चेहऱ्यावर दिसून आले समाधान

बीड (प्रतिनिधी):– स्पार्क मिंडा दिल्ली, अशोक मिंडा ग्रुप फाऊंडेशन, दिव्यांग सक्षम सशक्तीकरण केंद्र, पुणे मानव विकास संस्था शेलापुरी ता. माजलगाव जि.बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील दिव्यांगासाठी मोफत कृत्रिम अवयव वाटप शिबीराचे दि. २५ डिसेंबर २०१९ रोजी चिंबळी फाटा पुणे येथे आयोजित करण्यात आले होते. या शिबीरात बीड जिल्ह्यातील १३८ दिव्यांगांना कृत्रिम अवयवाचे वाटप करण्यात आले. या शिबीरात कृत्रिम अवयव मोफत मिळाल्याने दिव्यांगाच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आले. स्पार्क मिंडा दिल्ली, अशोक मिंडा ग्रुप फाऊंडेशन, दिव्यांग सक्षम सशक्तीकरण केंद्र, पुणे मानव विकास संस्था शेलापुरी ता. माजलगाव जि.बीड यांच्या संयुक्त विद्यमाने चिंबळी फाटा पुणे येथे बीड जिल्ह्यातील दिव्यांगासाठी मोफत कृत्रिम शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरासाठी जाण्याकरीता बीड जिल्हा रुग्णालय या ठिकाणावरुन दि. २४ डिसेंबर रोजी दिव्यांगासाठी मोफत बस सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली होती. या बसला पुणे येथील शिबीरासाठी निघालेल्या बसेसला जिल्हा समाज कल्याण अधिकारी आर.एच. एडके, हरी गिरी, क्रीडा संघटक शरद आंदुरे, पत्रकार विशाल साळुंके, बीड जिल्हा रुग्ण हक्क परिषदेचे अध्यक्ष शेख तैय्यब यांनी हिरवा कंदील दाखवून व नारळ फोडून रवाना करण्यात आले.

पुणे येथील शिबीरामध्ये दिव्यांग व्यक्तींच्या अपंगत्वाचे मोजमाप डॉ. सुमेध लव्हाळे, डॉ. सना दमानीया यांनी केले. या शिबीरात १३८ दिव्यांगांना कृत्रिम पाय, कॅलीपर, कुबड्या, काठ्या, व्हिलचेअर मोफत वाटप केले. या शिबीराला जाण्यासाठी जिल्ह्यातील दिव्यांगांना मोफत बस सेवा व भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. या शिबीराच्या समारोप प्रसंगी बीड जिल्ह्यातून अधिक दिव्यांगाना मानव विकास संस्था शेलापूरी ता. माजलगाव जि. बीड यांनी सहभागी करुन दिव्यांगत्वाचा लाभ मिळवून दिल्याबद्दल स्पार्क मिंडा फाऊंडेशन दिल्लीचे अशोक मिंडा, सारिका मिंडा यांनी संस्थेचे अध्यक्ष हरी गिरी यांचा स्मृतिचिन्ह व शब्द सुमनांनी सन्मान केला. हे शिबीर यशस्वी होवून जिल्ह्यातील दिव्यांग बांधव आपापल्या घरी परतल्यानंतर सर्वांनी समाधान मानले. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी शरद आंदुरे, राहुल गव्हाणे यांनी परिश्रम घेतले.



चंपावतीपत्र www.champavateepatra.in

# बीड जिल्ह्यातील १३८ दिव्यांगाना मोफत कृत्रिम अवयवाचे वाटप

## दिव्यांगांच्या चेहऱ्यावर दिसून आले समाधान



बीड । प्रतिनिधी

स्पार्क मिंडा दिल्ली, अशोक मिंडा ग्रुप फाऊंडेशन, दिव्यांग सक्षम सशक्तीकरण केंद्र, पुणे मानव विकास संस्था शेलापुरी ता. माजलगाव जि.बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील दिव्यांगासाठी मोफत कृत्रिम अवयव वाटप शिबीराचे दि. २५ डिसेंबर २०१९ रोजी चिंबळी फाटा पुणे येथे आयोजित करण्यात आले होते. या शिबीरात बीड जिल्ह्यातील १३८ दिव्यांगांना कृत्रिम अवयवाचे वाटप करण्यात आले. या शिबीरात कृत्रिम अवयव मोफत मिळाल्याने दिव्यांगाच्या चेहर्यावर समाधान दिसून आले. स्पार्क मिंडा दिल्ली, अशोक मिंडा ग्रुप फाऊंडेशन, दिव्यांग सक्षम सशक्तीकरण केंद्र, पुणे मानव विकास संस्था शेलापुरी ता. माजलगाव जि.बीड यांच्या संयुक्त विद्यमाने चिंबळी फाटा पुणे येथे बीड जिल्ह्यातील दिव्यांगासाठी मोफत कृत्रिम शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरासाठी जाण्याकरीता बीड जिल्हा रुग्णालय या ठिकाणावरुन दि. २४ डिसेंबर रोजी दिव्यांगासाठी मोफत बस सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. या बसला पुणे येथील शिबीरासाठी निघालेल्या बसेसला जिल्हा समाज कल्याण अधिकारी आर.एच. एडके, हरी गिरी, क्रीडा संघटक शरद आंदुरे, पत्रकार विशाल साळुंके, बीड जिल्हा रुग्ण हक्क परिषदेचे अध्यक्ष शेख तैय्यब यांनी हिरवा कंदील दाखवून व नारळ फोडून रवाना करण्यांत आले पुणे येथील शिबीरामध्ये दिव्यांग व्यक्तींच्या अपंगत्वाचे मोजमाप डॉ. सुमेध लव्हाळे, डॉ. सना दमानीया यांनी केले. या शिबीरात १३८ दिव्यांगांना कृत्रिम पाय, कॅलीफर, कुबड्या, काठ्या, व्हिलचेअर मोफत वाटप केले. या शिबीराला जाण्यासाठी जिल्ह्यातील दिव्यांगांना मोफत बस सेवा व भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. या शिबीराच्या समारोप प्रसंगी बीड जिल्ह्यातून अधिक दिव्यांगाना मानव विकास संस्था शेलापूरी ता. माजलगाव जि. बीड यांनी सहभागी करुन दिव्यांगत्वाचा लाभ मिळवून दिल्याबद्दल स्पार्क मिंडा फाऊंडेशन दिल्लीचे अशोक मिंडा, सारिका मिंडा यांनी संस्थेचे अध्यक्ष हरी गिरी यांचा स्मृतिचिन्ह व शब्द सुमनांनी सन्मान केला. हे शिबीर यशस्वी होवून जिल्ह्यातील दिव्यांग बांधव आपापल्या घरी परतल्यानंतर सर्वांनी समाधान मानले. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी शरद आंदुरे, राहुल गव्हाणे यांनी परिश्रम घेतले

सकाळ

# दिव्यांग व्यक्तींना साहित्य वाटप

## चिंबळीफाटा येथे शिबिर; भोरमधील ५२ जणांना लाभ

**भोर, ता. २९ :** तालुक्यातील ५२ दिव्यांग व्यक्तींना स्पार्क मिंडा फाउंडेशनच्या वतीने साहित्याचे वाटप करण्यात आले. यामध्ये कृत्रीम हात-पाय, कॅलिपर, कुबड्या, स्टीक, वॉकर, व्हीलचेअर, तीन चाकी सायकल आणि ब्लँकेटचा समावेश आहे.

खेड तालुक्यातील चिंबळीफाटा येथे झालेल्या दिव्यांग सशक्तीकरण शिबीराच्या समारोप प्रसंगी फाउंडेशनचे अशोक मिंडा व बजाज कंपनीचे एस. श्रीवास्तव यांच्या हस्ते साहित्याचे वितरण करण्यात आले.



चिंबळी फाटा (ता. खेड) : भोरमधील दिव्यांगांना साहित्य वाटप प्रसंगी स्पार्क मिंडा फाउंडेशनचे पदाधिकारी.

या वेळी प्रहार अपंग संघटनेचे बापूराव काणे, अभय पवार, महेंद्र निंबाळकर, बाबासाहेब जगताप, बापूसाहेब कुडले, जीवन टोपे, मृत्युंजय सावंत, रमेश शिंदे, अर्चना घुंडरे, राजू हिरवे, शिवाजी पवार, समीर घोडेकर आदींसह विविध अपंग संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. मिंडा फाउंडेशनतर्फे सर्व दिव्यांगांची येण्या-जाण्याची, राहण्याची व भोजनाची मोफत व्यवस्था करण्यात आली होती. भोर तालुक्यातील १२ महिलांसह ५२ जण या शिबिरात सहभागी झाले होते. दिव्यांगामुळे

आपणामध्ये काहीतरी कमी आहे, याची जाणीव आम्हाला शिबिरात झाली नाही आणि आम्ही इतर सर्वसामान्यांप्रमाणे कामे करू शकतो, असल्याची भावना आमच्या मनात निर्माण झाली, असल्याचे भोरमधील दिव्यांगांनी सांगितले.

पुढारी

संक्षिप्त



पुणे : मुंबई येथील स्पार्क मिंडा फाउंडेशन या सामाजिक संस्थेच्या वतीने राज्यातील दिव्यांग व्यक्तींचा नुकताच पुणे येथे सत्कार करण्यात आला.

# 'स्पार्क'तर्फे दिव्यांगांना साहित्य वाटप

**चांदवड :** मुंबई येथील स्पार्क मिंडा फाउंडेशन या सामाजिक संस्थेच्या वतीने राज्यातील दिव्यांग व्यक्तींचा नुकताच पुणे येथे सत्कार करण्यात आला. यात अपंगांना दैनंदिन वापरासाठी आवश्यक असलेल्या साहित्यांचे वाटप करण्यात आल्याची माहिती प्रहार संघटनेचे उत्तर महाराष्ट्र संपर्कप्रमुख चंद्रभान गांगुर्डे यांनी दिली. मुंबई येथील स्पार्क मिंडा फाउंडेशन या सामाजिक संस्थेद्वारा दरवर्षी राज्यातील दिव्यांग व्यक्तींच्या मदतीसाठी उत्कृष्ट कामकाज करणाऱ्या व्यक्तींचा सत्कार केला जातो. यावर्षी उत्तर महाराष्ट्रातून प्रहार संघटनेचे उत्तर महाराष्ट्र संपर्कप्रमुख चंद्रभान गांगुर्डे यांची निवड करण्यात येऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी दिव्यांगाना हात ङ्ग पाय, सायकल व्हीलचेअर, कुबड्यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास स्पार्क मिंडा फाउंडेशनचे अध्यक्ष अशोक मिंडा, उपाध्यक्षा सारिका मिंडा प्रहार संघटनेचे राज्याध्यक्ष बापू कान्हे, महिला अध्यक्षा अर्चना घुडरे, अभय पवार आदींसह मान्यवर उपस्थित होते.

# दि. ८ रोजी मोफत कृत्रिम पाय प्रत्यारोपण तपासणी शिबीर

बारामती - प्रहार संघटना व स्पार्क मिंडा, अशोक मिंडा ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत कृत्रिम पाय प्रत्यारोपण तपासणी शिबिर रविवार दि. ८ डिसेंबर रोजी रिमांड होम बारामती येथे ठेवले आहे. साहित्या वाटप दिनांक २४ डिसेंबर रोजी समक्ष-दिव्यांग सशक्तीकरण केंद्र, चिंबली फाटा, पुणे नाशिक रोड, ता. खेड, जि.पुणे पिन-४१०५०५ येथे होणार आहे. जाण्या येण्याची, नाश्ता, जेवण, गिफ्ट ह्या सुविधा पुर्णपणे मोफत देण्यात येणार आहे. तरी सर्व जास्तीत जास्त अपंग बांधवांनी याचा लाभ घ्यावा ही विनंती. तपासणी शिबीर वेळ सकाळी १० ते २ वाजेपर्यंत रिमांड होम बारामती येथे आहे व या शिबिरात रोजगार व सहायता मार्गदर्शन करणार आहे. तरी सर्व अपंग बांधवांनी याचा लाभ घ्यावा. संपर्क-मृत्युंजय सावंत अध्यक्ष-प्रहार संघटना बारामती तालुका मो. ९५९५५१३३४१ हरिकृष्ण जाधवसर-९०४४००५४५४, निलेश पवळे-९८८१०६७००६ स्पार्क मिंडा, अशोक मिंडा ग्रुप

# संगमनेरात उद्या दिव्यांग सशक्तीकरण मोफत शिबिर

संगमनेर (प्रतिनिधी)- जागतिक दिव्यांग दिनानिमित्ताने भारतीय जनता पार्टी दिव्यांग सेल संगमनेर आणि स्पार्क मींडा कंपनी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य दिव्यांग सशक्तीकरण मोफत शिबिर शुक्रवार दिनांक ६ डिसेंबर रोजी संगमनेर येथील श्रमिक मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आले आहे.

दिव्यांगाना कृत्रिम पाय, कृत्रिम हात, कुबड्या, व्हिल चेअर, तीनचाकी सायकल इत्यादी वस्तू आवश्यकतेनुसार मोफत मिळणार आहेत. या शिबिरासाठी अनुभवी व तज्ज्ञ डॉक्टर उपस्थित राहणार आहेत. शुक्रवारी शिबिरासाठी उपस्थित असलेल्या दिव्यांग रुग्णांची तपासणी केली जाणार आहे. तपासणीनंतर दिव्यांग रुग्णांना आवश्यकतेनुसार मोफत वस्तूंचे तारीख कळवून वाटप केले जाणार आहे.

जास्तीत जास्त दिव्यांग बंधू भगिनींनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन संगमनेर तालुका दिव्यांग आघाडीचे अध्यक्ष विनायक दाभोळकर, सुनील खरे, भाजप तालुका अध्यक्ष काशिनाथ पावसे, रामभाऊ जाजू, सरचिटणीस नानासाहेब खुळे, सुधाकर गुंजाळ, वाल्मिक शिंदे, शहराध्यक्ष राजेंद्र सांगळे, सरचिटणीस दिनेश सोमाणी, विकास गुळवे, प्रविण कर्पे यांनी केले आहे.

सकाळी ९ वाजता शिबिराचा शुभारंभ केला जाणार आहे. शिबिराचा समारोप दुपारी २ वाजता करण्यात येणार आहे. तरी दिव्यांग बंधू भगिनींनी उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन संगमनेर तालुका भारतीय जनता पक्षाच्यावतीने करण्यात येत आहे.

# 20 दिव्यांग प्रतिभाओं को मिला राज्य पुरस्कार

अमर उजाला ब्यूरो

**देहरादून।** समाज कल्याण विभाग की ओर से विश्व दिव्यांग दिवस के अवसर पर हुए कार्यक्रम में 20 दिव्यांग प्रतिभाओं को राज्य पुरस्कार से सम्मानित किया गया। स्वरोजगार, खेल और अन्य क्षेत्रों में उत्कृष्ट कार्य करने पर दिव्यांगों को पुरस्कार दिए गए।

### दिव्यांगजनों में होती है दिव्य शक्ति : यशपाल

दिव्यांगजनों में दिव्य शक्ति विद्यमान होती है। प्रदेश के दिव्यांगों ने खेल, शिक्षा समेत अनेकों क्षेत्रों में विश्व में पहचान बनाई है। ये सामान्य लोगों के लिए भी प्रेरणा हैं।

**- यशपाल आर्य, समाज कल्याण मंत्री**



विश्व दिव्यांग दिवस पर देहरादून के सुभाष रोड स्थित एक वेडिंग प्वाइंट में आयोजित कार्यक्रम में राज्य दिव्यांग पुरस्कार पाने वाले विभिन्न क्षेत्रों के दिव्यांगों के साथ समाज कल्याण मंत्री यशपाल आर्या,मेयर सुनील उनियाल गामा,विधायक खजान दास व अन्य।

समाज कल्याण मंत्री यशपाल आर्य ने कहा कि दिव्यांगजनों में दिव्य शक्ति विद्यमान होती है। प्रदेश के दिव्यांगों ने खेल, शिक्षा समेत अनेकों क्षेत्रों में विश्व में पहचान बनाई है। ये सामान्य लोगों के लिए भी प्रेरणा हैं।

मंगलवार को सुभाष रोड स्थित एक वेडिंग प्वाइंट में आयोजित कार्यक्रम की शुरुआत एनआईईपीवीडी (राष्ट्रीय दृष्टि दिव्यांग सशक्तीकरण संस्थान) के छात्रों ने 'वैष्णव जन..' संगीत की प्रस्तुति से की। इसके बाद विभागीय निदेशक विनोद गिरी गोस्वामी ने दिव्यांगों के लिए संचालित योजनाओं की जानकारी दी। मुख्य अतिथि समाज कल्याण मंत्री यशपाल आर्य ने कहा कि प्रदेश सरकार दिव्यांगों के सम्मान में कोई कमी नहीं छोड़ना चाहती। दिव्यांगों को रोजगार में आरक्षण व सरकारी परिवहन सेवाओं में निशुल्क यात्रा करने की सुविधा दी गई है। दिव्यांग संरक्षण अधिनियम में दिव्यांगों के साथ गलत व्यवहार करने वालों को कारावास व 5000 रुपये तक आर्थिक दंड का भी प्रावधान है। इसके बाद यशपाल आर्य ने दिव्यांगों को पुरस्कार व प्रमाण-पत्र प्रदान किए। दिव्यांग युवक-युवती से विवाह करने वाले दो लाभार्थियों को भी पुरस्कार राशि दी गई। इस अवसर पर मेयर सुनील उनियाल गामा, विधायक खजानदास, आयुक्त दिव्यांगजन मेजर योगेंद्र यादव, नोडल अधिकारी आईटी सेल हेमलता पांडेय, समाज कल्याण अधिकारी जीत सिंह रावत, सहायक समाज कल्याण अधिकारी दीपांकर घिल्डियाल व कई अन्य उपस्थित रहे।

## दिव्यांग प्रतिभाएं बन रहीं प्रेरणा

- **सुनीता सिंह :** शार्प मेमोरियल स्कूल फोर ब्लाइंड राजपुर रोड में शिक्षिका हैं, जो 100 फीसदी दिव्यांग हैं। ऐसे हालात में भी उन्होंने हार नहीं मानी और शारीरिक रूप से अक्षम बच्चों के जीवन को संवारने की ठानी।
- **मनदीप कौर :** एक पैर से 75 फीसदी दिव्यांग हैं। वर्ष 2017 में नेशनल आर्म रेसलिंग में प्रथम रहीं। राज्य स्तरीय बैडमिंटन में भी स्वर्ण पदक जीता।
- **पंकज राणा :** राणा ने इंटरनेशनल ब्लाइंड फुटबॉल में देश का नाम रोशन किया है। पंकज इंडियन ब्लाइंड फुटबॉल टीम के कप्तान भी हैं। उनके नाम कई रिकॉर्ड भी हैं।
- **रमेश चंद तिवारी :** रमेश पैर से 45 फीसदी दिव्यांग हैं। वह आटा चक्की का व्यवसाय कर रहे हैं। व्यवसायी के रूप में उन्होंने खास पहचान बनाई है। आज लोगों के लिए वह प्रेरणास्रोत बने हुए हैं।
- **भुवन चंद्र गुणवंत :** भुवन दोनों पैरों से 100 फीसदी दिव्यांग हैं। वह साइबर कैफे संचालित कर अपनी जीविका चला रहे हैं। चुनौतियों को हमेशा अवसर के रूप में लिया।
- **मिन्डा संस्था :** सिक्योरिटी से जुड़ी इस संस्था ने मूक-बधिर व अन्य दिव्यांगों की काबिलियत पर भरोसा करते हुए उन्हें अवसर प्रदान किए।

- नईम अख्तर (चूल्हा रिपेयरिंग की दुकान)
- अकील अहमद खां (पान की दुकान)
- प्रदीप कुमार (कनिष्ठ सहायक)
- सुनीता (डाटा एंट्री ऑपरेटर)
- सीमा पाल (कनिष्ठ सहायक)
- अभिनव गुप्ता (डार्क रूम सहायक)
- सौरभ गुप्ता (वोकेशनल सुपरवाइजर)
- श्याम सिंह नेगी (चतुर्थ श्रेणी कर्मचारी)
- मनोज सरकार (पैरा बैडमिंटन खिलाड़ी)
- राजीव कुमार (रेसलर, बैडमिंटन खिलाड़ी)
- राजदीप सिंह (बैडमिंटन खिलाड़ी)
- मनोज कुमार जोशी (राष्ट्रीय पदक विजेता)
- नईम अहमद (वॉलीबॉल खिलाड़ी)
- प्रेमा विश्वास (बैडमिंटन खिलाड़ी)




## प्रहारच्या संघटनेकडून मोफत कृत्रिम पाय प्रत्यारोपण तपासणी शिबीर

बारामती शहर येथील रिमांड होम येथे प्रहार संघटना व स्पार्क मिंडा, अशोक मिंडा ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत कृत्रिम पाय प्रत्यारोपण तपासणी शिबिराचे आयोजन 8 डिसेंबर रोजी करण्यात आले आहे. तसेच या शिबिरात रोजगार व सहाय्यता या विषयांवर मार्गदर्शन होणार आहे. यामुळे जास्तीत जास्त अपंग बांधवांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन प्रहार संघटनेचे बारामती तालुकाध्यक्ष मृत्युंजय सावंत यांनी केले आहे.

# श्रीरामपुरात दिव्यांग सशक्तीकरण तपासणी व मोजमाप शिबीर



दिव्यांग सशक्तीकरण मोफत तपासणी व मोजमाप शिबिरात सहभागी झालेले नागरिक.

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)**– अपंग सामाजिक कल्याण व पुनर्वसन संस्था श्रीरामपूर संचलित आधार दिव्यांग संघटना महाराष्ट्र राज्य तसेच स्पार्क मिंडा फाउंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने येथील आगाशे हॉल, आझाद मैदान येथे दिव्यांग सशक्तीकरण मोफत तपासणी व मोजमाप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिराला श्रीरामपूर तालुक्यासह अहमदनगर जिल्हा तसेच कन्नड, औरंगाबाद परिसरातील अनेक दिव्यांग उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय अत्याचार निवारण शक्तीचे प्रभारी अध्यक्ष सुरेश चौदान्ते होते तर स्पार्क मिंडा फाउंडेशनचे डॉ. सुमेध लव्हाळे, नितीन पांडे, डॉ. बालकृष्णन उपस्थित होते. यावेळी आधार दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष लक्ष्मण खडके यांनी पाहुण्यांचा सत्कार करून संघटनेबाबत व केलेल्या कामाची माहिती दिली.

यावेळी डॉ. सुमेध लव्हाळे यांनी शिबिराला जमलेल्या दिव्यांगांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून संघटनेच्या कार्याचा गौरव केला. तसेच यापुढेही आधार संघटनेसोबत काम करीत राहून विविध उपक्रमांतून दिव्यांगांचे पुनर्वसन करण्याचे आश्वासन दिले. कंपनीची माहिती सांगून दि. २४ डिसेंबर रोजी कृत्रिम जयपूर पाय, कृत्रिम जयपूर हात, कॅलिपर्स, कुबड्या, चाकी सायकल, व्हिलचेअर, वाकर इ. साहित्य मोफत वाटप करण्यात येणार असल्याचे सांगितले.

अध्यक्षीय भाषणात श्री. चौदंते यांनी आधार दिव्यांग संघटनेच्या विविध उपक्रमांचा उल्लेख करून कौतुक केले.

प्रास्ताविक तालुकाध्यक्ष विष्णूपंत पाठक यांनी केले. विवो हेल्थ केयरचे शाखाधिकारी सुरेश भोसले यांनी नोकरी संदर्भात मार्गदर्शन करून विविध क्षेत्रांतील व्यवसायाबाबत माहिती दिली.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी संपर्क प्रमुख रामभाऊ डमाळे, चाँद सय्यद, मुक्ताताई येवलेकर, संजीवनी सोनवणे, न.पा. दिव्यांग विभागाचे प्रमुख अरुण लांडे, संदीप शेलार, सुमित राहिले, अमोल तुवर यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन ज्ञानदेव शेळके यांनी केले तर आभार लक्ष्मण खडके यांनी मानले.

# संगमनेर येथे दिव्यांग सशक्तीकरण शिबिर संपन्न

संगमनेर (प्रतिनिधी) - संगमनेर येथे दिव्यांग सशक्तीकरण शिबिर संपन्न झाले. या शिबिरात एकशे पन्नास दिव्यांग बंधू भगिनींनी उपस्थित राहून सहभाग घेतला. यातील सुमारे सत्तर बंधू भगिनींची निवड कृत्रिम अवयव, व्हिल चेअर व तिनचाकी सायकल मोफत मिळण्यासाठी करण्यात आली आहे. २२ डिसेंबरला या वस्तूंचे वाटप पुणे येथे केले जाणार आहे. सर्व दिव्यांग बंधू भगिनींना पुणे येथे नेण्याची व आणून सोडण्याची व्यवस्था स्पार्कमिंडा फाऊंडेशन करणार आहे. भारतीय जनता पक्ष संगमनेर व स्पार्कमिंडा फाऊंडेशनने आयोजित केलेल्या या शिबिरात जागतिक अपंग दिनानिमित्त सर्व दिव्यांग बंधू भगिनींचा सत्कार करुन त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या दिव्यांग आघाडीचे अध्यक्ष विनायक दाभोळकर, सुनील खरे, विकास गुळवे, भाजप तालुकाध्यक्ष काशिनाथ पावसे, सरचिटणीस सुधाकर गुंजाळ, शहराध्यक्ष राजेंद्र सांगळे यांनी परीश्रम घेतले. यावेळी स्पार्कमिंडा फाऊंडेशनच्या डॉ. सना दमानिया यांनी रुग्णांची तपासणी केली तसेच अकबर शेख व विनोद शिर्के यांनी त्यांना सहाय्य केले. यावेळी भारतीय जनता पक्षाचे तालुकाध्यक्ष काशिनाथ पावसे यांनी सांगितले की देवेंद्र फडणवीस सरकारने दिव्यांगासाठी महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायत याठिकाणी पांच टक्के निधी खर्च करण्याची तरतूद केली. त्यातून दिव्यांगांच्या विकासाचा मार्ग मोकळा झाला. तसेच त्यांच्या सरकारने दिव्यांग व्यक्तिंच्या मानधनात वाढ करुन मोठे योगदान दिले आहे. या शिबिरात भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस वाल्मिक शिंदे, भरत फटांगरे, हरिष चकोर, वैभव लांडगे, भाऊसाहेब हासे, गोपीनाथ रुपवते, दिपक भगत, दादासाहेब नेहेपाटील, शैलेश फटांगरे, नारायण गडाख हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्तविक सरचिटणीस सुधाकर गुंजाळ यांनी केले तर आभार प्रदर्शन राष्ट्रीय अपंग विकास महासंघाचे विभागीय अध्यक्ष प्रकाश बैरागी यांनी केले.



**बाराच्या भावात**

पावसाने चिंब भिजला तरी,
लईच भाव खातोय कांदा ।।
डोळ्यात येते पाणी,
खाणाऱ्याचा झाला वांदा ।।

**- वसंत बंदावणे**